
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 6 | MARCH - 2026

# ‘गावकुस’ : एक गाव, एक युग, एक आत्मकथा

**डॉ. कैलास अंभुरे**
संचालक, विद्यार्थी विकास/मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००४. (महाराष्ट्र)

**सारांश :**




प्रस्तुत शोधनिबंधात प्रा. छबुराव भांडवलकर यांच्या 'गावकुस' या आत्मकथेचा सखोल वेध घेण्यात आला आहे. प्रा. छबुराव भांडवलकर यांच्या ‘गावकुस’ या आत्मचरित्राचा हा समीक्षात्मक अभ्यास मराठवाड्यातील कावजवळा या गावाच्या सुमारे आठ दशकांच्या (१९४०-२०२०) सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांच्या पार्श्वभूमीवर मांडला आहे. ‘नवं वावर’, ‘मळा’ आणि ‘बरड’ या तीन भागांत विभागलेल्या या आत्मचरित्रात निझामशाहीतील रझाकारी अत्याचार, प्लेग, बाहत्तरचा दुष्काळ, किल्लारी भूकंप आणि कोविड यांसारख्या ऐतिहासिक आपत्तींचे चित्रण येते. लेखकाचा शेतकरी कुटुंबातून शिक्षक-प्राध्यापक-सरपंच-साहित्यिक होण्यापर्यंतचा संघर्षमय प्रवास, दोन मातांचे वात्सल्य, कृषिसंस्कृती, ग्रामदैवते-श्रद्धा-परंपरा आणि जालना जिल्ह्यातील बोलीभाषेतील समृद्ध शब्दकळा यांचाही परामर्श घेतला आहे. फिलिप लेजून यांच्या ‘आत्मचरित्रात्मक करार’ सिद्धांताच्या आधारे या आत्मचरित्रातील स्मृतींची पुनर्रचना, निवडक सत्य आणि मर्यादाही अधोरेखित केल्या आहेत. एकूणच प्रस्तुत शोधनिबंधातून 'गावकुस'मधील निसर्गचित्रण, लोकश्रद्धा, शेतीचे बदलते स्वरूप, बोलीभाषेचा वापर आणि मानवी मूल्यांचा वेध घेत, या आत्मकथेचे महत्त्वपूर्ण साहित्यिक आणि सामाजिक मूल्य अचूकपणे अधोरेखित केले आहे.

**मुख्य शब्द :** गावकुस, छबुराव भांडवलकर, मराठवाडा, आत्मचरित्र, ग्रामसंस्कृती, कृषिसंस्कृती, निझामशाही, रझाकार, वारकरी संप्रदाय, बोलीभाषा, ग्रामीण साहित्य, स्थित्यंतरे इ.

“ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ॥ जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥”

सर्वसामान्यांसाठी ज्ञानभांडार खुले करणाऱ्या ‘ज्ञानेश्वरी’ या भाष्यग्रंथातील वारकरी संप्रदाय व अद्वैत तत्त्वज्ञानाचा पाया रचणारी ही अत्यंत महत्त्वपूर्ण अशी पहिली ओवी आहे. या साररूप ओवीमध्ये ज्ञानोबारायांनी कोणत्याही सगुण देवतेची आराधना न करता, निर्गुण, निराकार अशा वैश्विक ‘आत्मतत्त्वाला’ नमन केले आहे. ज्ञानोबाराय सर्वांच्या आधी असलेल्या अनादी, अनंत सृष्टीनिर्मात्या परब्रह्माला नमन करतात. या परब्रह्माचे आदिरूप ॐ कार असून त्याचे वेदांनी प्रतिपादन केले आहे. ज्याला स्वत: स्वानुभूतीने जाणता येते किंवा जो स्वत:ला स्वत:च जाणू शकतो असे परब्रह्मरूप दुसरे तिसरे कोणी नसून ते स्वत:चे ‘आत्मरूप’ (आत्म+रूप) आहे. ‘आत्मरूप’ मधील ‘आत्म’>‘आत्मन्’ म्हणजे ‘स्वत:चा’ किंवा ‘आत्म्याविषयीचा’ तर ‘रूप’ म्हणजे आकार किंवा बाह्य रूप. आत्मा हा अमूर्त असून सर्वव्यापी, अविनाशी तर रूप हे मूर्त असून विनाशी आहे. जेव्हा ज्ञानदेव आत्मरूपाचा उल्लेख करतात तेव्हा ते श्रोत्यांना ‘रूपा’कडून ‘अरूपा’कडे घेऊन जातात. हा प्रवास पाहणे-अनुभवणे-शोधणे अशा स्वरूपाचा म्हणजे स्वसंवेद्य, म्हणजेच आत्मानुभवाचा आहे. एका

अर्थाने जीवनात स्वत: स्वत:च्या जीवनाकडे-संसाराकडे-प्रकृतीकडे-ब्रह्मांडाकडे पाहण्याविषयी ते निर्देश करतात. ज्ञानदेव निर्देशित स्वसंवेद्य आत्मरूपाचा शोध वारकरी संप्रदायातील लेखक प्रा. छबुराव भांडवलकर 'गावकुस' या आत्मचरित्राद्वारे घेऊ पाहतात.

अलीकडील काळात खेड्यापाड्यातून लिहिणाऱ्या अनेक लेखक, कवींमुळे मराठी साहित्यविश्व अधिकाधिक समृद्ध, विस्तारित झाले आहे, होत आहे. यामध्ये भांडवलकरांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. कथालेखक, कादंबरीकार म्हणून सर्वपरिचित असलेले प्रा. छबुराव भांडवलकर हे मराठवाड्याच्या जालना जिल्ह्यातील कावजवळा (ता. परतूर) या छोट्याशा गावी राहून अविरत साहित्यसाधना करतात. त्यांचे 'बईनामा', 'उन्हाळी दिवस', 'डोह', 'हुरहुर' हे कथासंग्रह आणि 'ऊमनी', 'कोतवाल', 'थेट सरपंच', 'उभारी', 'बोंडअळी' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांचे 'गावकुस' हे आत्मचरित्र प्रकाशित होत आहे. मराठवाड्यातील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा शिक्षण घेऊन प्राध्यापक होतो, साहित्यिक होतो. त्याचा प्रेरणादायी प्रवास म्हणजे 'गावकुस' होय. हे केवळ एका व्यक्तीचे आत्मचरित्र नाही, तर यामध्ये गेल्या सत्तर-ऐंशी वर्षातील मराठवाड्यातील गावगाडा, तेथील माणूस, त्याचा संघर्ष, संस्कृती, निसर्ग, शिक्षण, शेती-माती-नाती आणि या सर्वामधील स्थित्यंतरे यांचे प्रांजळ चित्रण आहे.

प्रा. भांडवलकरांचे 'गावकुस' हे केवळ एक आत्मचरित्र नसून, ते मराठवाड्यातील ग्रामीण जीवन, शोषण, संघर्ष, विकास आणि परिवर्तनाचा दस्तऐवज आहे. यामध्ये साधारणत: १९४० ते २०२० असा आठ दशकांचा पट येतो. या आठ दशकातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, तांत्रिक, शैक्षणिक, शेतकी, भाषिक व मूल्यात्म स्थित्यंतरे येतात. तसेच निझामशाहीतील अंधार, रझाकारांचा दहशतवाद, स्वातंत्र्योत्तर काळ, शेतीविषयक संघर्ष, शिक्षणाचा प्रसार आणि बदलता गावगाडा येतो. 'गावकुस' या शीर्षकामध्ये गावाची 'कुस' म्हणजे गावाभोवतीचा तट, सीमा, परिसर वा हद्द निर्देशित होते. मात्र 'गावकुस' म्हणजे केवळ गावाभोवतीचे कुंपण नव्हे, तर ती मानवी जीवनातील सुरक्षितता, सांस्कृतिक ओळख आणि परंपरेची एक अदृश्य सीमा आहे. लेखकाने 'गावकुस' या शब्दाला व्यापक अर्थ दिला आहे, तो- गावाचे बाह्य रूप, ग्रामसंस्कृती, परंपरा, गावातील माणसे, नाती, परंपरा, श्रम, शेती, श्रद्धा, संघर्ष, माणुसकी, जीवनपद्धती आणि जीवनमूल्ये वगैरे. या कुसाच्या आत एक परिचित, सुरक्षित, सामूहिक अस्तित्व आहे, तर बाहेर अकराळ-विकराळ, अनिश्चित आणि कधीकधी क्रूर असे जग आहे. पूर्वी गुरंढोरं पडितामध्ये चरायला जात तेव्हा वाघ हल्ला करीत असे. "वाघानं जनावर नेलं की, माणसं म्हणायचे, 'चुचलीच्यानं वासरू नेलं गड्या.'" हा केवळ पशूवरचा हल्ला नसायचा तर मानवी अस्तित्वावर सतत संकट घोंघायचे. या द्वंद्वात मानवी धैर्य, सहिष्णुता आणि जगण्याच्या दुर्दम्य इच्छेची प्रचिती येते.

'गावकुस'हे आत्मचरित्र 'नवं वावर', 'मळा' आणि 'बरड' या तीन एकांकामध्ये विभागलेले आहे. लेखकाने कृषी संस्कृतीतील उपयोजलेल्या 'वावर', 'मळा' आणि 'बरड' या संज्ञांचा संबंध लेखकाच्या जीवन चरित्राशी आहे. या रचनात्मक योजनेमुळे आत्मचरित्रामध्ये सुसूत्रता तर येतेच सोबतच आशय निर्देशही होतो. 'नवं वावर' या एकांकामध्ये नायकाचे गाव, कुळ, जन्म, बालपण, गावातील वातावरण, निझाम काळातील अत्याचार, रझाकारांची दहशत, १९१८ चा प्लेग, भांडवलकर या आडनावाचा इतिहास, कौटुंबिक पार्श्वभूमी, शिक्षण, शेती, खेड्यातील आर्थिक व सामाजिक जीवन, गावकऱ्यांचे स्नेहबंध, सण-उत्सव-समारंभ इत्यादी माहिती येते. 'मळा' या दुसऱ्या भागामध्ये लेखकाचा शैक्षणिक प्रवास, लग्न सोहळा, वैवाहिक जीवन, पारंपरिक विधी, सांसारिक अडचणी, शिक्षकी पेशा, विद्यार्थ्यांशी जिव्हाळा, मुलांचा जन्म-कुटुंब विस्तार, आर्थिक प्रगती, सामाजिक कार्य, सरपंच पद, ग्रामविकासाची कामे इत्यादी आशयसूत्रे येतात. तर 'बरड' या तिसऱ्या भागात नोकरीतील शेवटचे दिवस आणि निवृत्ती, निवृत्तीनंतर पुन्हा लेखनाकडे वळणे, गाव, शाळा, विद्यार्थी यांच्या आठवणी, साहित्यसंपदा, चार धाम यात्रा, पंढरपूर वारी, दक्षिण भारत दर्शन, भजन, कीर्तन, देवपूजा, नातवंडांचे लाड, आजारपण, गावातील बदल, आधुनिकीकरणाचे दुष्परिणाम, शेतकऱ्यांचे प्रश्न, निसर्गाची अवकृपा, तरुण पिढीचा शहराकडे कल, आई-वडिलांचे संस्कार आणि मार्गदर्शन, कुटुंबातील एकता, आपुलकी आणि जीवनाचे सार्थक इत्यादी बाबींचा अंतर्भाव आहे.

लेखकाचा जन्म मराठवाड्यातील 'बनाचं जवळा' या छोट्याशा गावात झाला, ज्या गावाचे नाव पुढे 'कावजवळा' असे पडले. गावाच्या मधोमध खळखळणारी नदी आणि नदीकाठची सिंदीची, उंबराची, भोकराची झाडे. "गावात धनगर, न्हावी, धोबी, सुतार, बौद्ध, मांग, मुस्लिम समाजाची घरं... शिवाराच्या मधोमध दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहणारी जीवनदायी नदी. शिवारात वाघ, कोल्हे, डुकरं, खोकड मुक्त संचार करत." शिवाय, रझाकार गावात येऊन लुटालुट करत, मारझोड करत. सामान एका गावातून दुसऱ्या गावात न्यायला लावत. त्यामुळे गावकरी गोगलगायीसारखे पदराआड लपून जगत होते. निसर्गसमृद्धता असूनही मुक्त जगणे गावकऱ्यांच्या वाट्याला आले नव्हते. हे गावही मराठवाड्यातील अन्य गावांप्रमाणेच; या गावाच्या नामांतराचा किस्सा मोठा मजेदार असल्याचे भांडवलकर सांगतात, "असंच एकदा (रझाकारांनी) एक माणूस गावातून धरून आणला. तो प्रचंड घाबरलेला. यातून सुटका होणार नाही. याची पक्की खात्री. सुटका कशी करावी, या विचारातून तो हवालदाराला म्हणाला, 'हवालदार साहेब, मी जेवून येतो. उपाशी आहे. हवालदार तापला आणि दंड्याखाली मारत म्हणला, 'खामोश कुछ बोलने का नहीं.' बाजूलाच गावातील कोतवाल उभा होता. तो भीत भीत म्हणाला, 'जाऊ द्या साहेब, तो कवा

जेवला अन् कवा नाई. जेवून येईन.' हवालदारानं सोडला. दम दिला; पण झालं उलटं. तो गेला. पुन्हा परत आला नाही. त्यानं टप्पू लावला, 'अरे तेरा कवा जेवला कब आता?'

रझाकाराचा शिपाई गेला आणि त्यानं ठाण्यात जाऊन तक्रार केली, 'कवा जेवले का आदमी भाग गया." अशाप्रकारे 'बनाचं जवळा'चे नामांतर 'कवा जेवले' झाले आणि पुढे 'कवा' या शब्दाचा अपभ्रंश 'काव' झाला.

लेखक आपल्या गावाच्या इतिहासासोबतच स्वत:च्या कुळाचाही इतिहास सांगतो. लेखकाचे मूळ आडनाव मोरे होते, पुढे ते भांडवलकर झाले, याचाही गमतीदार किस्सा सांगितला आहे, "भर दुपारच्या वेळेला परकीय आक्रमण आलं. गावानं प्रतिकार केला. त्यात मोरे सगळयांच्या पुढे होते. शत्रू माणसं पळून गेली. गावातील माणसं म्हणाली, तुम्ही चांगली मारामारी, भांडणं करता राव. आजपासून तुम्ही 'भांडोनकर'. नाव गावानं दिलं. मी शाळेत गेलो आणि भांडवलकर म्हणालो. तसं लिहू लागलो." खरे तर, भांडवलकर यांचे पूर्वज बडोद्याच्या गायकवाड घराण्यात सेवा करायचे. कालांतराने मतभेदामुळे ते गुजरातमधून मराठवाड्यातील बनाचं जवळा या छोट्याशा गावी स्थलांतरित झाले. लेखकाच्या पूर्वजांचे हे स्थलांतर केवळ भौगोलिक नसून अस्तित्ववादी आहे. हे स्थित्यंतर मानवी आत्म्याच्या लवचिकतेचे आणि नव्या परिस्थितीत स्वतःला जुळवून घेण्याच्या क्षमतेचे प्रतीक आहे. मराठवाड्यात स्वातंत्र्यपूर्व काळात निझामी राजवट होती. यामुळे "दैव देतं; पण कर्म नेतं असंच काहीसं भाग्य या काळात होतं. राज्य निझामाचं. अत्याचाराचं आणि छळाचं. आपलं असून खाता येत नव्हतं आणि अंगावर लेता येत नव्हतं. सगळं झाकूनपाकून जमिनीतील पाण्यासारखं; पण रझाकार पोलिस, पाणी पाहणाऱ्या पायाळूसारखं येत आणि नासधुस करून जात." ही स्थिती तत्कालीन मराठवाड्यात कमीअधिक प्रमाणात सर्वच गावात होती. एकीकडे सुलतानी संकट तर दुसरीकडे १९१८ ला प्लेगची साथ आलेली. "घरातील उंदरांवर पिसा होऊन त्या माणसांना चावत. यामुळे काखेत गाठ येऊन भयंकर ताप येई. माणसं मरू लागली. एक मढं जाळून आलं की, दुसरं मढं तयार असे. माणसं सैरावैरा झाली. त्यात पावसाळयात पावसाचा थेंब नाही." निझामी राजवट, साथीचे आजार आणि दुष्काळासारखी नैसर्गिक आपत्ती यामुळे गावातील माणसं पुरती नामोहरम झालेली. अशा काळात कष्टाशी प्रामाणिक असलेल्या कुटुंबात छबुरावचा जन्म झाला. त्यांचे बालपण अत्यंत सामान्य कुटुंबात गेले. शेती हा कुटुंबाचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे लहानपणापासूनच त्यांच्यावर शेती आणि श्रमाचे संस्कार झाले. आई-वडिलांचे प्रेम, त्याग आणि संस्कार यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला. विशेषतः दोन मातांनी केलेले प्रेम, त्यांच्यातील भगिनीभाव अद्वितीय आहे. सावत्रपणाची भावना न जाणवू देता दोन्ही मातांनी लेखकाचा केलेला सांभाळ, दिलेले प्रेम, माया आणि त्याग यांचे वर्णन आत्मचरित्राला भावनिक उंची प्रदान करते.

लेखक छबुराव भांडवलकर यांचा शैक्षणिक प्रवास हा आत्मचरित्राचा एक केंद्रबिंदू आहे. ग्रामीण भागातील मर्यादित साधनसुविधा, आर्थिक अडचणी आणि अनेक संकटांना सामोरे जात ते शिक्षण घेतात. गावातील कोंडवाडावजा शाळेतील पहिल्या वर्गापासून त्यांचा शैक्षणिक प्रवास कावजवळा-डोल्हारा-पारडगाव-परतूर-जालना-औरंगाबाद असा एम. ए. (मराठी) बी. एड. पर्यंत होतो. त्यांनी शिक्षणासाठी केलेला संघर्ष, शाळेविषयी भीती, शिक्षकांचे प्रेम, मार्गदर्शन आणि उच्च शिक्षणापर्यंतचा प्रवास यांचे प्रेरक चित्रण 'गावकुस'मध्ये येते. त्यांचे वडील कोंडिबा यांना असलेल्या शिक्षण जाणिवेमुळे लेखकाच्या जीवनात शिक्षण हे सामाजिक आणि वैचारिक परिवर्तनाचे साधन ठरले. लहानपणी शाळेला 'कोंडवाडा' समजणारा लेखक शाळेत न जाण्यासाठी गुरांच्या गोठ्यात लपून बसायचा. पुढे आर. के. खतीब आणि कव्हाळे गुरुजींसारख्या शिक्षकांचे प्रेम आणि मार्गदर्शनामुळे त्यांना शिक्षणाची गोडी लागली. गावात शिक्षणाची सोय नसताना डोल्हारा, पारडगाव आणि नंतर परतूर येथे पायी चालत जाऊन त्यांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. याविषयी ते सांगतात, "शेणाची पाटी डोक्यावर घेऊन जगणाऱ्या कुणबी कुटुंबातील एक मुलगा कॉलेजची पायरी चढला होता." संपूर्ण खानदानातून पदवीधर (B.A.) आणि पदव्युत्तर (M.A.) शिक्षण घेणारा हा पहिला तरुण. जालना येथील जे. ई. एस. महाविद्यालय आणि औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठातील प्रवासात त्यांनी गरिबीचे चटके सहन केले. स्वतः स्वयंपाक करून उदरनिर्वाह केला; पण शिक्षणाची जिद्द सोडली नाही. विद्यापीठात शिक्षण घेताना खोकडपुरा, बेगमपुरा येथे एका छोट्याशा खोलीत राहून, वाचनालयात संदर्भ ग्रंथ वाचून त्यांनी ज्ञानाची भूक भागवली. येथे उषा हस्तक आणि विद्यापीठाच्या मराठी विभागातील डॉ. यू. म. पठाण, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. सुधीर रसाळ यासारख्या ऋषीतुल्य गुरुजनांच्या सहवासामुळे त्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावल्या, वाङ्मयीन जाणिवा विस्तारल्या. मात्र, उच्च शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराची समस्या कायम होती. तेव्हा श्री. बी. एम. कदम सरांनी आर्थिक मदत केल्यामुळे त्यांना बी.एड.ची पदवी संपादन करता आली. या काळातील विविध मुलाखती, नियुक्तीच्या प्रतीक्षेत गेलेला कालावधी आणि वारंवार येणारी निराशा यांचे चित्रण वाचकांना अस्वस्थ करते. अखेर १७ जुलै १९८५ रोजी त्यांची शिक्षक म्हणून नियुक्ती होते आणि लेखकाच्या आयुष्यात शिक्षणाचे फलित स्पष्ट दिसते. शिक्षणामुळे ते प्राध्यापक होतात, लेखक होतात, गावात सरपंचही होतात. ते

म्हणतात, "हातात पाटी घेतल्यामुळे आयुष्यभर पोळी खाण्यास मिळाली. नाही पैसा; पण मानसन्मान जीवापेक्षा मोठा मिळाला." त्यांचा हा संघर्ष केवळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादित नव्हता, तर तो संपन्न जीवनासाठीदेखील होता.

'गावकुस' हे आत्मचरित्र केवळ भांडवलकरांच्या आयुष्याची कहाणी नाही, तर एका गावाचा, एका पिढीचा आणि एका संस्कृतीचा इतिहास आहे. जन्मापासून ते तारूण्य, सरपंचपदाचा काळ आणि निवृत्तीनंतरचे जीवन भांडवलकर आपल्या मूळ गावी व्यतीत करत आहेत. त्यामुळे गाव आणि गावातील निसर्ग, नदी, झाडे, वन्यप्राणी, शेती आणि मातीत राबणाऱ्या माणसांचे ते सखोल व सूक्ष्म चित्रण करतात. गावातील लोकांचे निसर्गाशी असलेले नाते, त्यांच्या जगण्याचा संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारी एकजूट हे सर्व विशेष 'गावकुस'मध्ये स्पष्टपणे दिसतात. "माझं गाव! अंगावरील अंधाराची चादर हळूच बाजूला सरकवून जागं होई. कावळया-चिमण्यांच्या आणि गाई-वासरांच्या आवाजात गाव शुद्धीवर येई." या पहिल्या वाक्यातच गावाची समृद्धता जाणवते आणि "गावात माणसं कमी असल्यामुळे माया, प्रेम, जिव्हाळा भरभरून वाहत होता." ही ओळ आत्मचरित्रच नव्हे तर तत्कालीन ग्रामव्यवस्थेचे सचेतन रूप आहे. कारण हा गाव कारक आहे. येथे गाव म्हणजे केवळ भौगोलिक परिसर नसून भावनिक विश्व आहे. इथे माणसाचे माणसाशी जसे नाते आहे, तसेच निसर्ग, पशू आणि माती यांच्याशी नाळबंध आहेत. "गावात माणसं कमी असल्यामुळे माया, प्रेम, जिव्हाळा भरभरून वाहत होता. माणूस घरी आलाच तर त्याला तांब्याभरून दूध प्यायला देत. वयस्क असला तर चिलीम पिऊन जाई." अशा गावकऱ्यांच्या स्नेह व आपुलकीमुळे पूर्वी पन्नास उंबऱ्यांचे असलेले हे गाव हळूहळू विस्तारत गेले. ही प्रत्येकच गावाच्या विस्ताराची हकिकत आहे.

आत्मचरित्रातील पहिल्या वाक्याद्वारे गावातील सकाळ आणि निसर्गाच्या सान्निध्याचे सुंदर चित्रण येते. तद्वतच ग्रामीण जीवनातील नैसर्गिक लय, श्रमसंस्कृती आणि निसर्गाशी असलेले सखोल नातेही स्पष्ट होते. गावातील शेती, बैल, मोट आणि भुडकी यांसारख्या पारंपरिक संबोधातून तत्कालीन ग्रामव्यवस्थेची कल्पना येते. जुन्या काळी विहीर नव्हती. "नदीच्या कडेला रानात मोठा खड्डा खोदला जाई. त्याला 'भुडकी' म्हणत." या भुडकीवर चालणारी मोट, मोटेचा आवाज आणि रानातले हिरवे चैतन्य या कथनातून तत्कालीन शेती वास्तव प्रतीत होते. 'मोट' हे ग्रामीण जीवनातील एक महत्त्वाचे प्रतीक आहे. ती केवळ विहिरीतून पाणी काढण्याचे साधन नाही, तर ग्रामीण जीवनातील संघर्ष आणि लयबद्ध जगण्याचे प्रतीक आहे. आत्मचरित्रात मोटेचा 'कुई ऽऽऽ कुई ऽऽऽई' असा येणारा आवाज तत्कालीन ग्रामीण जीवनाच्या स्पंदनांचा, कष्टांचा आणि त्यातून मिळणाऱ्या समाधानाचा नाद आहे, तर दांडातून रानात जाणारे पाणी शेतीसह माणसांच्या जगण्यात चैतन्य आणते.

'गावकुस'मध्ये गावाप्रमाणेच निसर्ग हा देखील एक जिवंत पात्र आहे. हा निसर्ग खेडुतांच्या नव्हे तर, समग्र मानवी जीवनाचा, भावनांचा, आणि विचारांचा अविभाज्य भाग आहे. नदी, डोह, सिंदीची झाडे, जांभूळ, चिंच, पक्ष्यांचे आवाज, हिरवाई यांचे आत्मचरित्रातील चित्रण दृश्यात्मक आहे. "गावालगतची नदी पावसाळ्यात रौद्र रूप घेई; पण पावसाळा संपला की, एकदम शांत होई. बारोमास हसतखेळत खळखळ वाहत राही." या निवेदनातून प्रकर्षाने लेखकाची निरीक्षणदृष्टी आणि निसर्गप्रेम दिसून येते. नदीचे हे मानवीकरण लेखकाच्या काव्यमय संवेदनशीलतेचे द्योतक आहे. नदी ही मानवी संस्कृती आणि जिवित्वाची वाहिनी आहे. ती सृष्टीच्या विकासाचे रूपक आहे. तिच्यामध्ये खडखडीचा डोह, आसरांचा डोह, चुनखडीचा डोह, भोकरीचा डोह असे डोह आहेत. हे डोह माणसाच्या जीवनातील सुख-दुःख, समृद्धी आणि समाधानाप्रमाणे नदीला विश्रांती देतात, तिला खोली देतात आणि तिच्यामध्ये वैविध्य आणतात. या डोहांनीच नदीचे जीवन समृद्ध होते. नदी ही फक्त पाणी देत नाही, तर ती संपूर्ण परिसंस्थेला जीवनदान देते. तद्वतच ऋतूनुसार तिचे बदलणारे रूप हे प्रकृतीच्या बदलासह कालबदलाचे प्रतीक आहे. पावसाळ्यात नदी उद्दाम, उन्हाळ्यात शांत, हिवाळ्यात शीतल असते; मात्र आता वाळू उपसा, जलप्रदूषण आणि मानवी अतिक्रमण यामुळे सृष्टीच्या या 'धमण्या' कुठे ब्लॉक झाल्यात, कुठे आकुंचित झाल्यात तर कुठे लय पावल्या आहेत. त्यामुळे सृष्टीसह मानवी जीवनातील चैतन्य हरवत चालल्याची प्रचिती 'गावकुस'मधील 'बरड'मध्ये येते. लेखक निसर्गातील बदलासह गावातील बदलांना अधोरेखित करतो. परिवर्तन हा निसर्गनियम असला, भौतिक समृद्धतेने नवनवे उच्चांक प्रस्थापित केले असले तरी नैसर्गिक ऱ्हासातच मानवी नाश सामावलेला आहे, याची जाणीव भांडवलकर करून देतात. "पूर्वी गावात झाडी होती, आता स्लॅपची घरं. नदीचा खळाळ गेला, आता यंत्रांची घरघर आली. बैलगाडी गेली, टॅक्टर आले. पारंपरिक शेती गेली, रासायनिक शेती आली." हा बदल त्यांना अस्वस्थ करतो. ते म्हणतात, "हा बदल माणसाला हरवून टाकतोय." निसर्गाचे मूळ रूप बदलले आहे, ऋतू बदलले आहेत. "जिकडे तिकडे स्प्रिंकलर, तुषारचे फवारे दुरून दिसतात. पाणी आणि रासायनिक खतानं जमिनीचा पोत खराब झालाय." हा बदल केवळ बाह्य नाही, तर तो मानवीय देखील आहे. माणूस निसर्गापासून दूर जातोय, तो त्याचा भाग न राहता त्याच्या ऱ्हासाचे कारण बनतोय, ही खंतही ते व्यक्त करतात. भांडवलकरांनी निसर्ग केवळ पाहिला नाही, तर अनुभवला आहे. त्याच्याशी संवाद साधत ते त्याच्याशी एकरूप होतात, त्याच्यात आपले सुख-दुःख शोधतात. निसर्ग त्यांच्यासाठी गुरू आहे. ते लिहितात, "निसर्गानं मला

शिकवलं, शांतपणे वाहत राहा, खोलीत रहा, पण मोकळेपणा ठेवा." एकूणच, 'गावकुस'मध्ये येणारे निसर्गचित्रण हे गावमातीचे एक विशाल काव्य वाटते.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या आणि वाढलेल्या या गावाला निसर्गाबरोबरच ऐतिहासिक आणि सामाजिक संकटांचेही चटके बसले. निझामाच्या काळातील रझाकारांचा जुलूम, त्यांनी केलेली लूटमार आणि गावकऱ्यांची होणारी परवड याचे अनेकविध ऐतिहासिक संदर्भ 'गावकुस'मध्ये येतात. तसेच प्लेग, बाहत्तरचा दुष्काळ, किल्लारी भूकंप, कोविड या आपत्तींमुळे उद्भवलेली भीषण स्थिती लेखकाने प्रभावीपणे चित्रित केली आहे. निझामी राजवटीचा काळ हा या आत्मचरित्राच्या सामाजिक-राजकीय पटलावर एक गडद (Dark) असा महत्त्वाचा संदर्भ आहे. ही राजवट केवळ राजकीय सत्ता नसून, ती सामान्य माणसाच्या जगण्यावर आलेले संकट होते, एक बाह्य शक्ती होती, जी 'गावकुसा'च्या सुरक्षिततेला आव्हान देत होती. या दडपशाहीतून, अन्यायातून आणि संकटातून बाहेर पडण्यासाठी 'गाव' हाच एकमेव आधार होता, जिथे सामूहिक एकजूट आणि परस्परावलंबन हे जगण्याचे सूत्र होते. त्यामुळे गाव म्हणजे एक मोठे कुटुंब अशी भावना येथे सतत जाणवते.

आत्मचरित्राच्या सुरुवातीच्या भागात निझामशाहीतील अत्याचारांचे कथन आहे. लेखकाने हा इतिहास स्वतः पाहिला नाही; पण वडिलोपार्जित कथांनी, गावातल्या जुन्या माणसांनी सांगितलेल्या आठवणींनी हे चित्र त्याच्या मनात जिवंत झाले आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला; पण मराठवाड्याला एक वर्ष उशिराने स्वातंत्र्य मिळाले. हैदराबाद मुक्ती संग्राम झाला आणि मराठवाडा निझामी राजवटीतून १७ सप्टेंबर १९४८ ला मुक्त झाला, स्वतंत्र झाला. यापूर्वी मराठवाड्यातील माणसांवर रझाकारांची दहशत होती. "राज्य निझामाचं. अत्याचाराचं आणि छळाचं. आपलं असून खाता येत नव्हतं आणि अंगावर लेता येत नव्हतं." या एका वाक्यात लेखक निझामकालीन दमनाचे संपूर्ण चित्र मांडतो. रझाकार पोलिस 'पाणी पाहणाऱ्या पायाळूसारखे' गावात येत आणि विध्वंस करून जात. शेतकऱ्यांचे धान्य, जनावरे, सामान सर्वकाही लुटले जाई. "गावातील देवपूजा वगैरे त्यांना (मुस्लिमांना) विचारून करावी लागे. मंदिरातील घंटा मोठ्यानं वाजलेली जमत नव्हती. ...दारापुढे बसलेल्यांना सकाळ, संध्याकाळ चांगल्या खमंग शिव्यांचा खुराक असे. ...घरी किंवा रानातून खळ्यावरून धान्य उचलून नेलं जाई. प्रतिकार केला तर देहदंडाची शिक्षा होई." म्हणजेच मराठवाड्यात मुस्लीमांव्यतिरिक्त इतरांना धार्मिक स्वातंत्र्य नव्हते. माणसं लाचार, असहाय होती. हे संकट राजकीय होते, पण त्याचे परिणाम सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक होते. याच काळात १९१८ मध्ये प्लेगची भयंकर साथ येते. या काळाला 'साटऱ्या काळ' म्हणत. प्लेगची साथ आणि दुष्काळ एकत्र आल्याने गावाची अवस्था अत्यंत भयानक होते. यातून गावकऱ्यांना गाव सोडून रानात राहायला जाणे हा एकच मार्ग दिसतो. परिणामी आठ दिवसांत अर्धे गाव रिकामे होते. गाव सोडून रानात राहिल्याने संसर्गाची साखळी तुटली. या काळात माणसं पटापट मरायची. "गावात असं एकही घर नव्हतं ज्या घरातील माणूस गेलं नाही. तरुण, वृद्ध, महिलांच्या कपाळांना पांढरं करून तर अनेक पुरुषांना रांडव करून काळ जिभेने चाटत गेला." या वाक्यातून प्लेगची भीषणता आणि काळाची निर्दयता जाणवते. पुढे बाहत्तरमध्ये गावावर तिसरा आघात होतो. हा काळ लेखकाने प्रत्यक्ष अनुभवला आहे. त्यामुळे त्याचे वर्णन जिवंत व प्रभावी आहे. १९७२ मध्ये पाऊस पडला नाही. परिणामी शेती पिकली नाही. सर्वत्र अन्नान्न दशा झाली. पोटाची खळगी भरण्यासाठी लोक "सिंदीचे लहान बोंदे तोडून त्यातील गिर खाऊन लेकराबाळांना देऊ लागली. रानातून बखडे ओरबाडून आणून शिजवू लागली. त्यात मीठ टाकून लेकरं जगू लागली." एका परीने माणसाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. माणूस आपल्या अस्तित्वासाठी काहीही करू लागला. शेती हा शेतकऱ्यांचा, गावकऱ्यांचा श्वास, तो बंद पडला की, जगणेच कठीण होते. परिणामी काही लोक शहराकडे स्थलांतर करतात. त्यामुळे गाव ओस पडायला लागते. माणसाला स्वतःची जमीन, माती सोडून दूर जावे लागणे, ही वेदना जिव्हारी असली तरी अप्रत्यक्ष ग्राम संस्कृतीची पडझड असते. अशाच प्रकारचे महाभयंकर संकट २०१९ मध्ये कोविडच्या रूपाने जगावर आले. कोविडचे संकट हे दुष्काळ, प्लेग यापेक्षा वेगळे होते, पण त्याची तीव्रता कमी नव्हती. याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. कोविड काळात जग थांबले, रस्ते रिकामे, वाहने थांबली, कार्यालये बंद झाली आणि जगाला लॉकडाउनचा परिचय झाला. अलगीकरण, विलगीकरण, मास्क, सॅनिटायझर, वॅक्सिन अशा अनेक गोष्टींचा परिचय झाला. माणसांना माणसांची नव्याने ओळख झाली. माणूस माणसाला भिऊ लागला, नाती तुटली. आपण एकटेच आहोत याची जाणीव झाली. हा "कोरोनाचा काळ म्हणजे आत्मपरीक्षणाचा काळ होय. शोध घ्या, कळेल, कोणीच कोणाचं नसतं. असतो फक्त आणि फक्त आपण एकटेच. बाकी सगळा व्यर्थ पसारा." कावजवळा या गावानेच नव्हे, तर मराठवाड्याने अनुभवलेली निझामी राजवट, रझाकारी, प्लेग, दुष्काळ, किल्लारीचा भूकंप, कोविड या घटना माणसाच्या जगण्याची कसोटी आहेत. प्रत्येक संकटाने माणसांना वेगळ्या पद्धतीने मागे आणले; पण येथील माणूस प्रत्येक वेळी उठून उभा राहिला, आणि पुढे गेला. या संकटांनी गावाला, माणसांना धडे दिले. यातून 'गावकुस' समृद्ध होत गेले. माणसाची सहनशक्ती, त्याची अनुकूलनक्षमता, एकता, कृतज्ञता, आपुलकी, स्नेह आणि माणुसकी माणसांना 'गाव' म्हणून उभे करते. निझामी राजवटीमध्ये तो गुलाम होता, पण त्याने आपली संस्कृती जपली. प्लेगमध्ये तो घाबरला, पण त्याने निसर्गाचा आधार घेतला.

दुष्काळात तो भुकेला राहिला, पण इतरांना त्याने मदतीचा हात पुढे केला. कोरोनामध्ये तो एकटा पडला, पण त्याने आत्मपरीक्षण केले. एकंदरीत, या चारही संकटांचे भांडवलकर केवळ वेदना म्हणून चित्रण करत नाहीत, तर त्यातून मिळालेला धडाही मांडतात. ते म्हणतात, "जगायचं तर निर्मळ आणि चांगले वागा, कधी मरण येईल ते सांगता येत नाही." किंवा "संकटं येतात, जातात. पण माणूस राहतो. त्याची माणुसकी राहते. तीच खरी ताकद आहे." ही साधी, पण खोल उमज आणि शाश्वत जीवनमूल्ये हा लेखकाच्या जगण्याचा आत्मा आहेत.

कोणतेही चरित्र-आत्मचरित्र हे केवळ एका विशिष्ट माणसाची जीवनकथा नसते, तर त्यामध्ये समाज, संस्कृती, इतिहास, निसर्ग, त्या-त्या काळातील वृत्ती-प्रवृत्ती, विचारप्रणाली इत्यादींचा अंतर्भाव असतो. याप्रमाणेच 'गावकुस' या आत्मचरित्रामध्ये छबुराव भांडवलकरांच्या जीवन चरित्रासोबतच ग्रामीण महाराष्ट्राच्या कृषीसंस्कृतीचा आलेख येतो. येथे शेती ही केवळ उपजीविका नाही, तर ती जीवनपद्धती, संस्कारांची खाण, माणसाला निसर्गाशी जोडण्याचे साधन आणि मानवी चैतन्याचा उद्गार आहे. लेखकाने ही कृषीसंस्कृती अत्यंत प्रेमळ, आदरयुक्त चिकित्सा करत पडझडीसह विशिष्ट दार्शनिक उंचीवर मांडली आहे. 'गावकुस'च्या प्रारंभीच ते शेतीचे महत्त्व अधोरेखित करतात. लेखकाचे आजोबा शेतकरी, वडील शेतकरी, आणि लेखकही मूळ शेतकरीच. शेती ही भांडवलकर कुटुंबाची ओळख, त्यांचा अभिमान, आणि त्यांचे अस्तित्व. "शेती म्हणजे आई. तिची सेवा करा. मग पोटभर खा." या वाक्यात लेखकाने कृषी-ग्रामसंस्कृतीचा गाभा मांडला आहे. ग्रामीण जीवनाचा पाया शेती आहे. लेखकाने शेतीतील बदल, विहिरी, दुष्काळ, पाणीटंचाई, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रवेश यांचे वास्तव मांडले आहे. हल्ली विहिरींची जागा बोअरवेलने घेतली. तो म्हणतो, "पूर्वजांची खूण नष्ट झाली. आज मळयात तीन होल असून त्यावर सौर ऊर्जेच्या पाट्या बसवून पाणी काढण्यात येत आहे." पाण्याच्या अभावामुळे विहिरी बुजवल्या गेल्या आणि विहिरींसोबतच कंगण्या, ठिवण, थारोळं, मोट, नाडा असे वैविध्यपूर्ण सांस्कृतिक संचित लयास गेले, जात आहे.

शेतीचा आधुनिकतेकडे प्रवास झाला तरी शेतीमध्ये कष्टाशिवाय पर्याय नसतो. नव्हे तर, कष्ट हा शेतीसंस्कृतीचा पाया आहे. 'गावकुस'मध्ये शेतकरी व बैलांचे कष्ट आणि त्यांच्या संघर्षाचे आदरयुक्त चित्रण आहे. तद्वतच मोट, नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी इत्यादी कामाचे चित्रण आहे. ग्रामव्यवस्थेमध्ये सर्वांचेच मातीशी अतूट नाते असते. मातीशी हे नाते वंशपरंपरागत आहे. "बापजाद्यानं शेती पोटापाण्यासाठी पिकविली." या वाक्यातून मातीत राबण्याऱ्या पिढ्यानपिढ्यांचा इतिहास येतो. कृषीव्यवस्थेमध्ये शेतातील कामे ही कुटुंबाची बांधिलकी आणि निष्ठा दर्शवतात. "सगळी मिळून खळं काढत, सगळी मिळून पिकं कापत, सगळी मिळून सुगी साजरी करत." या निवेदनातून शेतीतील समूहभाव, एकता, समन्वय आणि प्रेम यांचा प्रत्यय येतो. शेती हा केवळ व्यवसाय नाही, तर माणसांची नाती जोडणारी संस्कृती आहे. शेतीतील विविध कामाच्या निमित्ताने विविध सण, उत्सव साजरे केले जातात. मातीची कुस उजवण्यासाठी किंवा काळ्या आईचे ऋण फेडण्यासाठी वेगवेगळे विधी केले जातात. पोळा, दिवाळी, हळदी-कुंकू, मकर संक्रांत, नागपंचमी या सणांना शेतीचे संदर्भ आहेत. पैसा आला; समाधान गेले. उत्पादन वाढले, पण मातीची सुपीकता कमी झाली. यंत्रे आली आणि बैल गेले. "पूर्वीचा शेतकरी समाधानी होता, आजचा तरुण शेतकरी बेचैन आहे. पूर्वी माणसे वावरात राबत होती, आज ते शहराकडे पळत आहेत." अशी खंत भांडवलकर व्यक्त करतात. तद्वतच "आधुनिक यंत्रे, रासायनिक खते, हायब्रीड वाण आले. शेती बदलली, पण शेतकरी बदलला का?" असा सवाल ते करतात. या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे येते. कारण शेतकरी अजूनही दयनीय स्थितीत आहे. एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे शासनाची उद्योग-व्यवसाय धार्जिणी धोरणे, व्यापारी वर्गाकडून सतत नाडवले जाणे, बँक आणि कृषीकेंद्राच्या चक्रव्यूहात गोल गोल फिरणे, पीकविमा, कर्ज, व्याज, उद्योजकांकडून होणारे भूसंपादन, आणि प्रशासकीय अनास्था या सर्वांमुळे शेतकरी कोलमडून पडला आहे. लेखक म्हणतो त्याप्रमाणे, "पेरलं, उगवतं आणि जग त्याच धान्यावर जगतं; पण जगविणारा कोलमडून पडलाय. अवस्था भयानक झालीय." काळानुसार शेतीत बदल झाले. बैलगाडीऐवजी ट्रॅक्टर, कुपनलिका, शेततळे, स्प्रिंकलर, पाईपलाईन, हार्वेस्टर, रोटावेटर, लेसर लॅण्ड लेव्हलर, मल्चर इत्यादी आधुनिक साधनांचा वापर वाढला. सध्या शेती पिकते; पण ती नफ्यात नाही. या व्यवसायातून मुबलक पैसा कमवून एखादा शेतकरी करोडपती झाला, आमदार/खासदार झाला अशी उदाहरणे शोधून मिळत नाहीत. "अनुभव माणसाला शहाणं करत असतो; दरवर्षी शेतीचा अनुभव वाईटच येतोय." शेतीमध्ये निश्चितच काही बदल झाले, पण खर्चही वाढला. परिणामी शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकत गेला. आशा एवढीच आहे की, "घडणी, मांडणी आणि मोडणी हे कालचक्र अव्याहत चालू असतं."

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये कुटुंब ही अत्यंत महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. व्यक्तीवर विविध संस्कार कुटुंबातच होतात. 'गावकुस'मध्ये लेखकाच्या जडणघडणीत आई-वडील, भावंडे, सवंगडी, पत्नी, गावकरी आणि भेटलेली माणसं यांचे प्रभावी योगदान आहे. या आत्मचरित्रात खेड्यातील परस्परावलंबी एकत्र कुटुंबव्यवस्था आलेली असून कुटुंबातील प्रेम, त्याग, जबाबदारी आणि परस्पर सहकार्य यांचे अनेक प्रसंग लेखकाने नोंदवले आहेत. लेखकाला सुबाबाई (लहानी बाई) आणि धुरपताबाई (मोठी बाई) या दोन माय होत्या. त्या दोघी सवती असूनही त्यातील जन्मदाती आई कोणती हे त्याला लहानपणी कळले नाही; एवढा नात्यांमध्ये ओलावा होता. "गाव म्हणते सुबाबाई आणि धुरपताबाई सवती सवती आहेत. 'सवत' या शब्दाचा अर्थ अजूनही कळला नाही. हा शब्दसुद्धा कधी जवळ फिरकला नाही, घरात

आला नाही. घराचा नांद्या अतिशय मजबूत होता. यामुळे सवत हा शब्द गावाबाहेर फिरत होता." या दोन्ही मातांनी लेखकावर आणि भावंडांवर पोटच्या मुलासारखे प्रेम केले. लेखकाच्या बालपणीचा एक प्रसंग हृदयस्पर्शी आहे. विंचू चावलेल्या बालकासाठी आईची धडपड आणि वडिलांची काळजी यांचे वर्णन वाचकांना अस्वस्थ करते. या प्रसंगातून ग्रामीण मातृत्वाचे करूण, त्यागमय रूप समोर येते. लेखकाचे वडील कोंडिबा (बाबा) हे अत्यंत शिस्तप्रिय, स्वाभिमानी आणि प्रामाणिक शेतकरी होते. ..त्यांनी मुलांवर लाळघोटेपणा न करण्याचे आणि कष्टाने मोठे होण्याचे संस्कार केले. शेतीवर नितांत प्रेम करणारे, मजुरांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला देणारे आणि इतरांना मदत करणारे वडील हे लेखकाचे पहिले आदर्श. त्यांच्यामुळेच नायकाचे शिक्षण होऊ शकले, तो स्वाभिमानाने उभा राहू शकला. त्याचे बाबा हे कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि श्रमशील व्यक्तिमत्त्व म्हणून उभे राहतात. त्यांनी मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यांचे संस्कार रुजवले. ग्रामीण समाजात व्यक्तीपेक्षा समूहाला अधिक महत्त्व असते. त्यामुळे एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याची नैतिकता येथे वारंवार प्रकटते. लेखक नववीमध्ये शिक्षण घेत असतानाच त्याचा विवाह 'किशाबाई' यांच्याशी होतो. लग्नानंतर मोठी आई किशाबाईचे नाव 'लक्ष्मी' ठेवते. बालवयात विवाह झाल्यामुळे पुढील शिक्षणाच्या काळात लक्ष्मीबाईच्या वाट्याला विरह आणि त्याग येतो. शिक्षणासाठी नवऱ्याला दूर शहरात पाठवताना पत्नीच्या डोळ्यांतील अश्रू, तिने केलेले कष्ट, तिची मूक साथ आणि 'नवऱ्याला नोकरी लागेल आणि चांगले दिवस येतील' या आशेवर अनेक उपासतापास करणारी पत्नी ही लेखकाच्या यशस्वी वाटचालीतील कणा आहे. तिच्याविषयी नायक कृतज्ञता व्यक्त करतो. पुढे त्यांना अरूण, विश्वनाथ आणि काशीनाथ ही तीन मुलं झाली; पण मुलगी नसल्यामुळे जीवनाचा एक कप्पा रिकामा राहिला अशी खंत ते व्यक्त करतात.

'गावकुस'मध्ये मराठवाड्यातील ग्रामीण जीवन आणि संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडते. खेडेगावातील माणसांची जीवनपद्धती, त्यांचे संस्कार, परंपरा, सण-उत्सव, आणि त्यांचे एकमेकांशी असलेले नाते यातून ही संस्कृती समृद्धपणे उभी राहते. ही ग्रामसंस्कृती माणसांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. देव ते दैव, उत्सव ते व्रत, मंदिर ते मशीद, ज्योतिष ते जादूटोणा तसेच श्रद्धा, अंधश्रद्धा, कर्मकांड, भक्ती इ. धाग्यांनी हे ग्रामीण जीवन गुंफलेले असते. त्यामुळे ग्रामदेवता, सण-उत्सव, विधी-व्रते, श्रद्धा-परंपरा, आणि लोकजीवनातील यात्रा, भजन, नामसप्ताह, पोळा, दिवाळी, मोहरम असे अनेक सांस्कृतिक समारंभ येथे येतात. अनेक गावांमधील देवता या त्या गावाची ओळख असतात. त्यांचे रक्षण करणे आणि तिच्याद्वारे गावाचे रक्षण होते अशी धारणा यामुळे प्रत्येक गावात मारोती, देवी, महादेव अशा देवता असतात. कावजवळयामध्ये मारोती, भैरवनाथ, महादेव, विठ्ठल-रुख्मिणी, तुळजाभवानी या देवता गावाच्या आध्यात्मिक जीवनाचा भाग आहेत. "गावात विविध देवतांना माणसं मनोभावे मानत. पूजाअर्चा करत. सगळं गाव भक्तिमय होई." तसेच गावातील मंदिरात चालणाऱ्या भजन, कीर्तन, काकड आरतीच्या माध्यमातून श्रमपरिहार, विरंगुळा, भक्ती यासोबतच सद्भाव आणि समाजबांधणीही झालेली दिसते. लेखक स्वतः वारकरी संप्रदायातील असल्याने तो भजन-कीर्तन, पारायण, सप्ताह यामध्ये सहभागी होतो. विशेषत: निवृत्तीनंतर "सकाळी चारच्या आधी उठून सगळं आटोपलं की, देवपूजेसोबत काकड भजन. देवपूजा झाली की, 'रामकृष्ण हरी'ची गावात प्रभात फेरी." असा त्याचा नित्यक्रम आहे. तो म्हणतो, "मला या सगळ्यांचा फायदा असा झाला की, पंचक्रोशीत कोठेही धार्मिक कार्यक्रम असला की, माझं पत्रिकेत नाव येतंय." यावरून एक शिक्षक, प्राध्यापक, सरपंच, साहित्यिक म्हणून जसा छबुरावांचा लौकिक आहे, तसाच सांप्रदायिक कार्यक्रमातही त्यांना पंचक्रोशीत सन्मान आहे.

'गावकुस'चा आणखी एक विशेष म्हणजे येथे लोकश्रद्धा अनेक रूपांत दिसतात. या श्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा नव्हे, तर शतकानुशतके चालत आलेला सामूहिक विश्वास, जो माणसांना संकटात आधार देतो, सणात आनंद देतो, आणि दुःखात सहारा देतो. गावातील झोटिंगबाबा, मसोबा, मुंजाबाबा, बाळूमामा यांसारख्या ग्रामदेवतांवर गावकऱ्यांची निस्सीम श्रद्धा. शेताच्या रक्षणासाठी असलेल्या मसोबाविषयी लेखक सांगतो, "रानात एका बाजूला बरीच मोठमोठी दगडं आहेत. त्यापैकी एका दगडाला आजोबा-पणजोबांनी शेंदूर लावून मसोबा केलेला. सणावाराला, खळं, पेरणीला मसोबाला नैवेद्य, उदबत्ती, शेंदूर लावून नारळ फोडल्या जातं. रानात गेलं की, अगोदर मसोबाच्या पाया पडल्या जातं." मसोबा सारख्या ग्रामदैवतांविषयीची श्रद्धा ही पिढ्यानपिढ्या चालत आली आहे. मसोबा देवासंदर्भात त्याची मोठी आई त्याला सांगते की, "एक गवळी आपल्या म्हशी चारत येथे आला; पण या रानाला एका देवीचा शाप होता. येथे जनावर आले तर दगड होईल. अन् तसंच झालं." अशी दैवतं गावोगावी प्रत्येकाच्या शेतात दिसून येतात आणि अशा आख्यायिकादेखील. शिवाय विविध देवांना नवस बोलणे आणि आपली इच्छा पूर्ण झाल्यानंतर नवस फेडणे हे खेड्यापाड्यातील पूर्वीचे प्रकार आजही प्रचलित आहेत. लेखकाची पत्नी लक्ष्मी यांनीदेखील देवाला नवस केले होते. त्या नवसांची पूर्तता दोघे करतात. "तुळजापूरची भवानी, माहेरची मळुबाई माता, जालन्याची दुर्गामाता, सप्तश्रृंगी देवी, रांजणीची भवानी माता या तीर्थांना पत्नीसोबत जावच लागलं." असे नवस लोकश्रद्धेचे सर्वोत्तम उदाहरण आहे. लक्ष्मी म्हणते, "माणूस संकटात असतो ना तेव्हा त्याच्या तोंडातून आपोआप देवाचं नाव येतं. यासाठी कुठंही जावं लागतं." म्हणून दुखनकऱ्याची माय वेडी असते, असे म्हटले जाते.

पूर्वी पारंपरिक शेती व्यवसायामध्ये बैल महत्त्वाचा होता. शेतीच्या मशागतीसाठी बैल मिळावेत, खत, दूध मिळावे यासाठी गाईगुरांना विशेष स्थान असे. (आज खेड्यापाड्यात ही स्थिती नाही, हे खेदाने नमूद करावे लागते.) पोळ्याच्या सणाद्वारे बैलांप्रती आणि दिवाळीला गाई-म्हशींविषयी कृतज्ञता व्यक्त केली जात असे. "गाईवासरांची सेवा, त्यांचं दूध, तूप, ताक हे सगळं घरातील दैनंदिन जीवनाचा भाग" होता. तर पोळ्याचा सण हा शेतकरी आणि बैल यांच्या नात्याचा उत्सव आहे. शेतीचा आधार बैल, त्यांची पूजा म्हणजे कृतज्ञता होय. कवी विठ्ठल वाघ यांनी बैलाला 'भूदेव' संबोधले आहे. घरच्या गाईच्या पोटी जन्माला आलेले वासरू पुढे गोऱ्हं आणि नंतर बैल होऊन शेतीमध्ये कष्ट करायला लागते. शेतकरी आणि बैलांच्या श्रमाला निसर्गाची साथ लाभते आणि धान्याच्या राशी घरी येतात. या धान्यराशी म्हणजेच शेतकऱ्यांची लक्ष्मी. एकूणच, 'गावकुस'मध्ये पूजा-पाठ, भजन-कीर्तन, विधी-विधाने, यात्रा-जत्रा, धर्म हा केवळ मंदिर-पूजेपुरता मर्यादित नसून तो माणसाचे दैनंदिन जीवन, शेती, कुटुंब, आणि सामाजिक संबंधांचा अविभाज्य भाग असल्याचे दिसते.

गावगाड्यामध्ये श्रद्धांबरोबरच शकुन-अपशकुन, ज्योतिष पाहणे, मुहुर्त काढले जातात. लेखकाच्या लग्नाच्या वेळी "सुधाकर गुरू खळेदळे मागण्यासाठी आले. भटजीबुवानं पंचांग उघडलं. हाताच्या बोटावर मोजून रास नावावरून गणित जुळविलं आणि म्हटलं, 'वैशाख वद्य नवमी संध्याकाळचं मुहूर्त चांगलं आहे.'" या सर्व गोष्टी केवळ पूर्वी प्रचलित होत्या असे नाही तर, आजही सर्वत्र प्रचलित आहेत. उदा. विवाह समारंभ पत्रिकांमध्ये आजही शुभ मुहुर्ताचा उल्लेख केला जातो. वास्तुशांती, गृहप्रवेश, उद्योग-व्यवसायाचा प्रारंभ इ. सर्व मुहुर्तानुसार केले जाते. यापैक ी काही विधी-विधाने काळानुरूप बदलली, तर काहींमध्ये अधिक स्तोम माजवले जात आहे. यासंदर्भात लेखक म्हणतो, "मोबाईल आला, मोटारसायकली आल्या, पण देवघरातील दिवा मात्र तसाच आहे." आधुनिकतेमुळे सण-उत्सवांचे स्वरूप बदलले आहे. फटाके, लाईटिंग, डीजे, साउंड सिस्टम हे नवीन बदल झाले असले तरी काही गोष्टी टिकून आहेत. "आजही गावात मारोतीची यात्रा भरते, पोळा साजरा होतो, देवळात घंटा वाजते, घरोघर दिवा लागतो." हे सांस्कृतिक सातत्य श्रद्धा, परंपरा, आणि सामूहिकता या त्रिसूत्रीने टिकून आहे.

भांडवलकर यांनी एम. ए. मराठी पदवी संपादन केल्यानंतर त्यांच्यासमोर नोकरीचा प्रश्न होता, तो बी.एड. केल्यानंतर सुटतो आणि त्यांच्या जीवनातील आर्थिक संघर्षाला विराम मिळतो. त्यांना परतूर येथील वैजनाथराव आकात यांच्या मराठवाडा सर्वोदय शिक्षण मंडळाच्या लाल बहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरी मिळते. यावेळी त्यांच्या कुटुंबियांना विशेषत: पत्नी लक्ष्मीला अतोनात आनंद होतो. "स्वत: पतीसाठी अस्तित्व हरवून बसलेल्या व्यक्तीला क्रांतीचा स्वच्छ प्रकाश दिसल्यावर किती आनंद होत असावा तेवढा आनंद तिला झाला." असे ते म्हणतात. शाळेत त्यांच्यावर वर्गशिक्षक, परीक्षा प्रमुख, सांस्कृतिक विभागप्रमुख इत्यादी जबाबदाऱ्या सोपवल्या जातात. त्यांनी शाळेत निष्ठा, सचोटी आणि प्रामाणिकपणे कर्तव्य केले. "पावसानं ओलंचिंब झालो, थंडीनं कुडकुडलो, उन्हात घामाघूम झालो; पण नाही थांबलो. आत्मिक ओढीनं येत गेलो. कर्म म्हणून शिकवत गेलो." या काळात त्यांनी अनेकविध अनुभव घेतले. या अनुभवांनी त्यांना एक उत्तम शिक्षक आणि एक समाधानी माणूस बनवले. त्यांनी कष्ट, प्रामाणिकपणा, आणि विद्यार्थ्यांशी प्रेम या त्रिसूत्रीवर संस्थेत सेवा केली. "शाळा हे पंढरपूर, विद्यार्थी हे वारकरी समजून शिकविण्याची भक्ती करत होतो." असे ते म्हणतात. याच मूल्यामुळे ते लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक होतात. या संस्थेचे प्रमुख श्री. वैजनाथराव आकात, श्री. बाबासाहेब भाऊ आकात, श्री. बी. एम. कदम यांनी त्यांना मदत केली, वारंवार मार्गदर्शन केले आणि प्रेरणा दिली. या सर्वांप्रती ते कृतज्ञ आहेत. "एका कष्टकऱ्या कुणब्याच्या लेकराला संस्थेनं आपल्या कुशीत घेऊन माया, प्रेमाची मुक्तहस्ते उधळण केली. माझ्या गावमातीचा सन्मान केला. माझं कर्तृत्व फुलविलं. त्याला संधी दिली. मीसुद्धा या संधीचं सोनं केलं. यामुळे मला ओळख मिळाली. लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय माझ्या रक्तात, नसानसांत भिनलय. एवढंच नव्हे तर पोटातील भाकरी, अंगावरील कपडे केवळ या संस्थेचे आहेत. संस्थेनं, आकात कुटुंबाने मला सगळं दिलं. माझंच नव्हे तर माझ्या पुढच्या पिढीचं कल्याण केलं. या जन्मी तरी या उपकाराची परतफेड करता येणार नाही." ही जाणीव उलट्या तंगड्या करण्याच्या काळात दुर्मिळ आहे. प्रा. भांडवलकर स्वत:चे शैक्षणिक कार्य सांगतानाच परतूर परिसरातील शिक्षण संस्थेचे कार्य सांगून जातात. त्यांनी विद्यार्थ्यांशी कधीही अंतर ठेवले नाही. ते त्यांच्याशी प्रेमाने, आदराने, आणि जिव्हाळ्याने वागत त्यामुळे विद्यार्थ्यांशी त्यांचे अतुट नाते निर्माण झाले. "विद्यार्थी निष्पाप. खळखळून हसत. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आजही मला जशास तसा आठवतो." अनेक विद्यार्थी घडवल्यानंतर याच संस्थेतून प्राध्यापक म्हणून ते सेवानिवृत्त होतात. निवृत्तीनंतरही ते सवयीप्रमाणे महाविद्यालयात जायला निघतात, यावरून त्यांच्या निष्ठेचा प्रत्यय येतो. "मी सेवानिवृत्त झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी सगळं आटोपून गाडीवरून अर्ध्या वाटेवर आलो. बाजूला रस्त्यालगत निंबाचं झाड होतं. त्याखाली गाडी उभी केली. पाणावलेल्या डोळ्यानं समोर धुरकट रोड दिसत होता. मी विचारात उभा... 'काय करू, पुढे जाऊन? आपलं नाव हजेरीपटावरून काढून टाकलं असेल. सही कोठे करणार? वर्गावर कसे जाणार. विद्यार्थ्यांना काय सांगणार; पण मला...' मी अक्षरश: रडत उभा होतो." असे ते सांगतात. येथे त्यांच्या कर्तव्यपरायण निष्ठेचा प्रत्यय येतो. पुढे 'कामातच दवे आहे. काम में काम अन् भज ले राम' या तत्त्वाने ते शेती, भजन-कीर्तन, लेखन यामध्ये स्वत:ला

गुंतवून घेतात. त्यांच्या नोकरीच्या काळात त्यांनी १५ वर्षे सरपंच म्हणून गावाच्या विकासासाठी काम केले. या काळात त्यांनी ग्रामविकासाला प्राधान्य देत संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी योजना यांसारख्या शासकीय योजना गावकऱ्यांपर्यंत पोहोचवल्या. तसेच डीआरडीएमार्फत कर्जसाह्य मिळवून दिले. शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक या भूमिकांसोबतच सरपंच म्हणूनही त्यांनी गावाच्या उन्नतीसाठी योगदान दिले. त्यांची राजकीय भूमिका सत्तेपेक्षा सेवाभावी व विकासाभिमुख होती, हे विशेष.

प्रस्तुत आत्मचरित्र जसजसे पुढे सरकत जाते तसतसे लेखक छबुराव भांडवलकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू उलगडत जातो तो म्हणजे, लेखक म्हणून त्यांचे कार्य. एक मुलगा, पती, शिक्षक, सरपंच, वडील, शेतकरी, कुटुंबप्रमुख या भूमिकांसोबतच ते लिहिते लेखक आहेत. 'गावकुस'मध्ये त्यांच्या जीवनचरित्रासोबतच त्यांचे साहित्य चिंतन आणि सृजनशील प्रवासाचे चित्रण आहे. भांडवलकरांच्या लेखनप्रवासाची सुरुवात त्यांच्या बालपणीच्या अनुभव संस्कारातून झाली. गावातील लोकगीते, म्हणी, कथा, आणि आई-वडिलांचे संस्कार यांनी त्यांच्या मनात साहित्यबीजे रुजली. पुढे महाविद्यालयीन जीवनात त्याला आकार प्राप्त झाला. महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये त्यांची 'वेडीवाकडी' ही कथा छापून येते. येथूनच त्यांचा लेखनप्रवास सुरू होतो. त्यांच्या लेखनप्रवासामध्ये त्यांचे गुरुवर्य, मराठवाडा विद्यापीठ, ग्रंथालय आणि मराठी विभाग यांचा अनमोल वाटा आहे. त्यांच्या लेखनाविषयी ते म्हणतात, "मी प्रामाणिकपणे कबूल करतो. मी लेखक नाही. मला सूचतं ते मांडतो. ...कोणी वाचो अथवा न वाचो लिहीत राहायचं." पुढे ते म्हणतात, "मी लिहितो. चांगलं की वाईट ते वाचक ठरवतील." येथे त्यांच्या स्वच्छंदी, प्रामाणिक भूमिकेचा प्रत्यय येतो. संत साहित्याचे त्यांच्यावर संस्कार झालेले असल्याने साहित्यातून जीवनवास्तव यावे असे ते म्हणतात. "साहित्यिक नवनिर्मिती करण्याची ताकद ठेवतो. तडजोड न करता आहे तेच मांडतो. नाही तरी कल्पनेच्या भराऱ्या या क्षेत्रात जमत नाही. तो कल्पनेनं आकाशात झेप घेतो; पण वास्तवाचं भान येताच जमिनीवर येतो तेव्हा त्याची नाचक्की होते. म्हणून कल्पना नको तर वास्तव हवं." भांडवलकरांची ही भूमिका अण्णा भाऊ साठे यांच्या भूमिकेची आठवण करून देते. "मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. जीवनातील वास्तवच विस्मयकारक असते. त्याच्या सान्निध्यात कल्पना लुळीपांगळी ठरते." असे अण्णा भाऊ म्हणत. परंतु अण्णा भाऊंनी साहित्यात रंजकता स्वीकारली होती. इथे छबुराव मात्र रंजकतेच्या आहारी जात नाहीत. घटना, प्रसंग अधिक फुलवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. कल्पनेपेक्षा अनुभवसिद्ध वास्तवाला प्राधान्य देणारी, रंजकतेपासून दूर आणि जालना जिल्ह्याच्या बोलीभाषेतील शब्द-म्हणींनी समृद्ध अशी त्यांची शैली आहे. त्यांनी जालना जिल्ह्यातील बोलीचा मुक्त स्वीकार केला आहे. 'पावणं', 'नाईतं', 'नांद्या', 'काट्या', 'लय', 'हाय', 'गड्या', 'भुरकी', 'नादर', 'सालगडी', 'पांदी', 'उतळ', 'वायदा', 'बारबंडी', 'कुस', 'ओढा', 'मसला' हे ग्रामीण बोलीभाषेतील शब्द आणि वाक्प्रचार, म्हणी यांचा सुयोग्य अवलंब केल्यामुळे कथन प्रभावी झाले आहे. 'श्रीमंतांचं जळू नये घर आणि गरिबाची मरू नये बायको', 'बामण सांगेन ती दिशा, नाव्ही ठेवीन तेथे मिशा', 'येरे माझ्या मागल्या अन् बस पाठकुळी', 'माझी रंडकी तर तुझी रंडकी', 'लाभ न नफा; पण चिपडी करी खेपा', 'बैल ना खड्या अन् औत उभाट्या', 'आब डुबे तो डुबे लेकिन यजमान को ले के डुबे' इत्यादी म्हणी ग्रामीण जीवनातील अनुभव आणि शहाणपण दर्शवतात. 'झुळझुळत्या प्रवाहात असंख्य नदीपात्र येऊन मिळतात आणि एक समृद्ध नदी तयार होते', 'वारुळात पाणी गेल्यावर जशा मुंग्या बाहेर निघतात तसे माणसं रस्त्यावर चर्चा करू लागली', 'हृदयाच्या जखमेला काळच मलमपट्टी करतो', 'मनाशी मन आणि पाण्याशी पाणी एकरूप होतं', 'प्रश्नांच्या घनदाट जंगलात प्रयत्नाचा दिवा हाती घेऊन फिरलं तर उत्तराची सोपी वाट नक्की सापडते. यासाठी प्रयत्नाचा दिवा मात्र विझू द्यायचा नसतो', 'पोटाची भूक बळीराजामुळे तर बुद्धीची भूक महात्म्यांच्या विचारांनी भागते', 'झाडाच्या मुळ्या आणि खोड मजबूत असलं की, फांद्या-पानांना चिंताच नसते. ते जीवनाचा आनंद बिनधास्त घेत धुंदीत जगत असतात', 'झाड पाहून घाव आणि माणूस पाहून बोल असतो', 'बिजांची वेल, वेलीला फुलं, फळं कधी येतात ते तिला कळतसुद्धा नाही; वाढत राहणं, पुढेपुढे चालणं एवढंच माहीत असतं', 'माणूस हतबल झाला की उदास आणि दु:खी मनानं परिस्थितीला सामोरे जातो', 'वेळ बदलत असते. पैसा येत-जात असतो; पण आपले संस्कार सोडायचे नसतात. आदर, माया, प्रेम, त्याग विसरायचा नसतो. हीच मोठी संपत्ती असते.' इत्यादी सुभाषितवजा, अलंकारिक, मूल्यात्म वाक्ये आत्मचरित्रभर दिसून येतात. तसेच "चुचलीच्यानं वासरू नेलं गड्या." अशा बोलीभाषेतील वाक्यांमुळे कथनात अस्सलपणा आला आहे. मधमाशांचे मोहोळ उठवणे, रेल्वे इंजिनमध्ये कोळशाचा प्रसंग असे बालपणीचे प्रसंग निवेदन करताना लेखकाची शैली मिश्किल होते, तर विरहाचे आणि गरिबीचे प्रसंग सांगताना ती अत्यंत कारुण्यपूर्ण होते. 'गावकुस'ची रचना 'प्रसंगमालानुरूप' (Episodic) आहे; म्हणजे स्वतंत्र प्रसंगांची मालिका आहे. लेखकाचे आयुष्य हेच या प्रसंगांना जोडणारे एक मध्यवर्ती सूत्र आहे. यामधील बोलीचे सेंद्रीय उपयोजन वाचकांना ग्रामीण महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेशी आणि मानवी मूल्यांशी जोडून तर ठेवतेच सोबतच व्यक्तीला गावाशी आणि गावाला व्यक्तीशी नव्याने कनेक्ट करते.

'गावकुस' या आत्मचरित्राच्या मूल्यात्म विधानाकडे जाताना मला फ्रेंच समीक्षक फिलिप लेजून यांच्या 'आत्मचरित्रात्मक करार' (Autobiographical Pact) या सिद्धांताची आठवण होते. या सिद्धांतामध्ये लेजून म्हणतात की, आत्मचरित्र हा लेखक आणि वाचक

यांच्यातील एक अलिखित करार असतो, ज्यामध्ये लेखक आपल्या वास्तविक जीवनाचे प्रामाणिक वर्णन करण्याचे वचन देतो आणि लेखक, निवेदक व नायक यांची वास्तविक ओळख एकच असल्याची हमी देतो. पुढे ते म्हणतात, आत्मचरित्र म्हणजे लेखक, निवेदक आणि नायक हे तिघेही एकच व्यक्ती असल्याचा दावा करणारे, गद्यात लिहिलेले, वास्तविक व्यक्तीच्या जीवनाचे पूर्वलक्ष्यी निवेदन होय. यामध्ये १. लेखक-निवेदक-नायक यांची एकात्मता (Identity), २. निवेदनाचे गद्यरूप आणि पूर्वलक्ष्यी (Retrospective) स्वरूप, आणि ३. लेखक आणि वाचक यांच्यातील एक मूक करार (Autobiographical Pact) या तीन अटी अंतर्भूत आहेत. याद्वारे आत्मचरित्रकार वाचकाला सांगतो, "मी जे लिहितोय ते माझेच, खरेखुरे, सत्य जीवन आहे." आणि वाचक त्यावर विश्वास ठेवण्याचे मान्य करतो. हा करार प्रामुख्याने लेखकाच्या नावावर (Onomastic identity) आधारलेला असतो. जेव्हा पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील लेखकाचे नाव, निवेदकाचे नाव आणि कथेतील नायकाचे नाव एकच असते, तेव्हाच हा करार पूर्णतः कार्यान्वित होतो. यानुसार 'गावकुस' या आत्मचरित्राकडे पाहिले असता, यामध्ये मानवी स्मृतीच्या मर्यादा आणि आत्मचरित्रात्मक लेखन यामधील अंतर्विरोध समोर येतो. स्मृती हे भूतकाळाचे वस्तुनिष्ठ साधन नसते, तर वर्तमानकालीन मानसिकतेनुसार भूतकालीन स्मृतींची पुनर्रचना केली जाते. भांडवलकरांनी बालपणीच्या खोड्या किंवा मित्रांसोबतचे थेट संवाद ज्या अचूकतेने लिहिले आहेत, तिथे साधारणत: पाच/सहा दशकांपूर्वीच्या काळातील विस्मरणाची दरी भरून काढण्यासाठी काही अंशी कल्पकता किंवा अंदाज याचा आधार घ्यावा लागला, हे उघड होते. तसेच रझाकारी, निझामी राजवटतील घटना-प्रसंगदेखील ऐकीव आहेत. येथे 'पूर्वदृष्टीचा पूर्वग्रह' (Hindsight Bias) काम करतो. वर्तमानातील परिपक्व अशा प्राध्यापक पदावरून निवृत्त झालेल्या लेखकाचे वर्तमान ज्ञान नकळतपणे भूतकाळातील बालवयाच्या अनुभवांवर हावी होते. बालपणी वडिलांच्या शिस्तीचा वाटणारा राग, किंवा शाळा कोंडवाड्यासारखी वाटणे, स्वत:च्या जीवनातील संघर्ष, दु:खाकडे पाहताना तो 'मी घडलो' अशा आत्मसमर्थनाकडे (Self-justification) झुकतो. कोणत्याही आत्मचरित्राचा केंद्रबिंदू 'मी' असतो. त्यामुळे इतर पात्रे दुय्यम असतात, वा तसे चित्रण केले जाते. येथेही अन्य व्यक्तिरेखा सह-व्यक्तिरेखा म्हणून उभ्या राहत असल्या तरी त्यांच्या अंतरंगाचा लेखक ठाव घेत नाही. विशेषतः पत्नीच्या मानसिक घुसमटीचे वरवर चित्रण येते. पत्नीने केलेल्या त्यागाचा उल्लेख येतो; परंतु तिच्या मानसिक संघर्षाच्या आत डोकावून पाहिले जात नाही. तिचे अंतरंग उलगडत नाही. लेखकाच्या बालपणीचे प्रसंग, निसर्ग चित्रण आणि आदर्श मूल्यवादी दृष्टिकोन यामध्ये सत्य आणि काल्पनिकतेच्या सीमारेषा धुसर झालेल्या आहेत. याशिवाय, गावात अनेक जातीजमातीचे लोक असूनही गावातील विशिष्ट जातीचे चित्रण येते. तसेच अलीकडील काळात मराठवाड्यातून सुरू झालेले मराठा मूक मोर्चे, मराठा आरक्षण आंदोलनाला खेड्यापाड्यातून मिळणारा पाठिंबा, वाढलेले जातीद्वेष, अच्छे दिन, जातीय राजकारण, माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट, भाऊबंदकी, कौटुंबिक कलह वगैरे घडामोडींचे प्रतिबिंब दिसत नाही. अनेक घटना, अनेक वर्णने, अनेक उपमा पुनरावृत्त होतात. तसेच सरपंचपद आणि संस्थेच्या कामाचे तपशीलही वारंवार येतात. लालित्यपूर्ण कथन सुरू असताना दिलेली आकडेवारी तादात्म्य भंग करते. मात्र १९१८ ला आलेली प्लेगची साथ, १९७२ चा दुष्काळ, पंचायत राज व्यवस्था, शैक्षणिक बाजारीकरण, १९९३ चा किल्लारी भूकंप, कोविड-१९ या घटना ऐतिहासिक आहेत, हे विशेष. यामुळे 'गावकुस' दस्तावेज ठरते. वडील, आई यांच्या मृत्यू प्रसंगांचे उल्लेख आहेत; पण संयमी स्वभावामुळे दु:खावेग कमी होतो. लेखकाने आपल्या जीवनातील चुका, अपयशांकडे दुर्लक्ष केल्याचे जाणवते. आत्मचरित्र म्हणजे 'सत्य' असा एक सामान्य समज आहे; परंतु कोणतेही आत्मचरित्र हे नेहमीच 'निवडक सत्य' (Selective Truth) असते. लेखक कोणत्या घटना निवडतो, कोणत्या वगळतो, कोणत्या वर्णनाचा किती विस्तार करतो याचे त्याला स्वातंत्र्य असते.

लेखक छबुराव भांडवलकर यांचे जीवन स्वाभिमान, संयम आणि अध्यात्म या तीन ध्रुवांवर उभे आहे. मराठवाड्यातील एका खेड्याच्या पार्श्वभूमीवर साकारलेले हे आत्मचरित्र ग्रामीण जीवनातील संघर्ष, निसर्गाशी असलेले आदिम नाते, सामाजिक स्थित्यंतरे, मूल्यऱ्हास आणि आत्मशोधाचा प्रवास अत्यंत प्रभावीपणे मांडते. 'गावकुस' हे केवळ भौगोलिक सीमांचे द्योतक नसून, ते मानवी मनाच्या सुरक्षिततेची, ओळखीची आणि बाह्य जगाशी असलेल्या संघर्षाची प्रतिकात्मक अभिव्यक्ती आहे. ग्रामीण साहित्य प्रवाहामध्ये जी काही बोटावर मोजण्याइतपत आत्मचरित्रे आहेत, त्यामध्ये 'गावकुस'चा समावेश होतो. कारण हे आत्मचरित्र केवळ एका प्राध्यापकाची वैयक्तिक यशोगाथा नसून, ते मराठवाड्याची संस्कृती, ग्रामीण बदल, शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, अठराविश्व दारिद्र्यातून शिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर एका व्यक्तीने नव्हे, तर पिढीने काढलेला मार्ग आणि हरवत चाललेल्या ग्रामसंस्कृतीचा सजीव ऐवज आहे. यामध्ये व्यक्तिगत पातळीवर छबुराव नावाच्या एका माणसाची प्रेरक जीवन कहाणी; साम ाजिक स्तरावर एका गावाची कथा; ऐतिहासिक पटलावर एका काळाचे चरित्र; सांस्कृतिक स्तरावर एका संस्कृतीची कहाणी आणि तात्त्विक पातळीवर एका जीवनाच्या अर्थाची, अस्तित्वाची, माणुसकीची अक्षरमय कहाणी आहे.

छबुराव भांडवलकरांनी जीवनात अनेक आव्हाने, संकटे सहन करून जिद्दीने स्वत:ची ओळख निर्माण केली. काळ हा प्रवाही असतो, त्यामध्ये चढउतार असतात. याची जाणीव भांडवलकरांना असल्याने येणारा काळ कठीण असेल या जाणिवेतून ते स्वत:ची

मानसिक तयारी करतात. पुढे २००० नंतरचा काळ त्यांच्यासाठी काही आव्हाने घेऊन येतो. वडिलांच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनी दोघे भाऊ विभक्त होतात आणि अलीकडे तीन मुलेही विभक्त झाली आहेत. सर्वांचा संसार सुखाचा सुरू आहे. नातवंडं शिक्षण घेत आहेत. आज आयुष्याच्या संध्याकाळी कृतार्थतेने ते लिहितात, "मी आज अशा वळणावर उभा आहे की, गतकाळाचा सुखद वारा आणि पुढे दिसतोय अंधार वाटेतील टिमटिमता दिवा. दूर खूप दूर तो उजेड. या उजेडाला शिवण्याचा खेळ सुरू होणार आहे. त्या शिवाशिवीची तयारी मी केलीय; पण या पळापळीला सुरुवात होण्याअगोदर मी सक्षम जीवनाचा आस्वाद घेतलाय. आज माझ्याकडे सगळं आहे. पांडुरंगाच्या आशीवार्दानं सुखाच्या शेजारी पहुडलो आहे. म्हणूनच संतश्रेष्ठ माउलींच्या ओळी आठवतात-

"आजी संसार सुफळ जाला गे माये । देखियले पाय विठोबाचे ॥"

'साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण' पद्धतीने जीवनानुभव घेतलेले भांडवलकर, ज्ञानोबा माउलींच्या वरील ओवीने 'स्वसंवेद्य आत्मरूपा'च्या प्रवासाला पूर्णविराम देतात. त्यांचे संपूर्ण जीवनकथन वारकरी संप्रदाय आणि ज्ञानोबा-तुकारामांच्या भक्तिमार्गी परंपरेतूनच साकारले आहे. त्यांना आज कृतार्थ झाल्याचे समाधान आहे. त्यांनी जीवनभर केलेले परिश्रम, त्यांचा संघर्ष आणि भौतिक संपत्तीपेक्षा नैतिक चारित्र्याला प्राधान्य देणारी मूल्यप्रणाली यामुळे ते जीवनात 'कुस उजवल्याची' भावना व्यक्त करतात. भांडवलकर जीवनामध्ये जसे यशस्वी झाले, तसेच आत्मशोधाच्या प्रवासातही यशस्वी झाले असे म्हणता येते. कारण आषाढी-कार्तिकी वारी करून जे समाधान लाभते, आनंद मिळतो आणि मानवतेचा मार्ग प्राप्त होतो. तीच भावना 'स्वसंवेद्य आत्मरूपा'च्या प्रवासात भांडवलकरांची आहे. अनेक वर्षे प्रतिकूलतेच्या अंधारात चाचपडल्यानंतर, दारिद्र्याशी झुंज दिल्यानंतर जेव्हा भांडवलकर प्राध्यापक होतात, लेखक म्हणून सर्वपरिचित होतात, स्वतःसह मुलांना स्थिरस्थावर करतात, तेव्हा त्यांना मिळणारे समाधान हे विठ्ठल दर्शनाच्या आनंदाएवढेच अलौकिक असणे स्वाभाविक आहे.

**संदर्भ :**


१. काळुंखे, रामचंद्र. *ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास*. प्रथमावृत्ती : १५ जुलै २०१६, औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स.
२. https://l1nq.com/28fig68
३. https://www.aksharnama.com/client/article_detail/1178
४. लुलेकर, प्रल्हाद जी. *मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास*. प्रथम आवृत्ती : १७ सप्टेंबर २०२१, औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स.
५. भांडवलकर, छबुराव. *गावकुस*. छत्रपती संभाजीनगर : अभंग पब्लिकेशन हाउस, अप्रकाशित.